**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण जळगांव,**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, मायादेवी मंदिरासमोर, महाबळरोड जळगांव**

दूरध्वनी क्र-०२५७-२२६३३२८/२९ Email ID :acswojalgaon@gmail.com

जा.क्र.सआसकजळ/ शिष्यवृत्ती/ संभ्रम/निराकरण/ 2600/२०२० जळगांव दि.24/ ०८ /२०२०

प्रति,

प्राचार्य,

------------------------------------

------------------------------------

------------------------------------ जि.जळगांव

आवक पत्र क्रमांक: 49

दिनांक: 24/08/2020

विषय - सन २०१९-२० शैक्षणीक वर्षाकरीता महाडिबीटी पोर्टलवरील अनुसचित जाती, विजाभज, इमाव, व विमाप्र प्रवर्गातील मान्य झालेल्या शिष्यवृत्ती अर्जांची यशस्वी वितरण (Disbursement) प्रक्रीयेबाबत निर्माण झालेल्या संभ्रमाचे निराकरण करणेबाबत.

संदर्भ - १. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन दि.८.१२.२०२०

२. मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय म.रा.पुणे यांचे पत्र क्र.८६५ दि.२०.८.२०२० या कार्यालयास प्राप्त मेल दि.२१.८.२०२०

३. मा.आयुक्त,यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१.८.२०२० रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरंस मधील निर्देश

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये आपणास कळविण्यात येते की, मा.आयुक्त, समाज कल्याण विभाग म.रा.पुणे यांना प्राप्त निवेदना नुसार तसेच राज्यभरातील अनेक स्थानिक विदयार्थी-पालक संघटनांनी शासनाच्या वेळोवेळी लक्षात आणून दिल्याप्रमाणे विदयार्थ्यांचे तसेच महाविदयालयांचे पहिला हप्ता किंवा दुसरा हप्ता किंवा दोन्ही हप्त्यांतील शिष्यवृत्ती अर्ज मंजूर होऊन देखील देय असलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम अदयापही संबंधीत विदयार्थी/ महाविदयालयांच्या बँक खात्यात जमा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

याबाबत संदर्भ क्र.२ व ३ अन्वये प्राप्त निर्देशानुसार शिष्यवृत्तीच्या अर्जांवर या कार्यालयामार्फत ऑनलाईन प्रणालीव्दारे मान्यता प्रदान केल्यावर मा.आयुक्तालयस्तरावरुन (DDO) त्यांचे देयके तयार करुन कोषागारातून देय असलेली रक्कम पारीत करुन महाडिबीटी पोर्टलच्या Pool बँक खात्यामध्ये जमा करण्यांत आलेली आहे. सदर देय असलेली रक्कम ही PFMS या केंद्रभूत वितरण प्रणालीमधून विदयार्थ्यांच्या व महाविदयालयाच्या बँक खात्यामध्ये थेट महाडिबीटी प्रणालीव्दारे जमा होणे अपेक्षीत आहे. मात्र त्यापुर्वी PFMS प्रणालीमधून वितरण करण्यापूर्वी लाभांर्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्यास संलग्न असल्याचे NPCI या केंद्रभूत पडताळणी प्रणालीतून मान्य झालेल्या पात्र लाभार्थ्यांचे आधार बँक खात्याची पडताळणी करण्यात येते. तथापि, या पडताळणी प्रक्रीयेस PFMS व NPCI यांच्याच स्तरावर विलंब होत असल्याचे सामाजिक न्याय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निर्देशनास आले आहे.याबाबत मा.आयुक्तालय, म.रा.पुणे व शासनस्तरावरुन माहिती व

Publish on website
23/8/20

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

तंत्रज्ञान संचालनालयास तसेच राज्यस्तरावरील PFMS व NPCI या कार्यालयांना वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. या शिवाय देयक जनरेट झालेल्या अर्जापैकी ब-याच विदयार्थ्यांचे खात्यात शिष्यवृत्तीचे वितरण सदयस्थितीत महाडिबीटी प्रणालीवरील Pool Account व PFMS या प्रणालीव्दारे सुरु असून सन २०१९-२० या शैक्षणीक वर्षातील विदयार्थ्यांची शिष्यवृत्तीचे रक्कम आधारसंलग्न बँक खात्यात अदयाप जमा व्हावयाची आहे. सदरील रक्कम PFMS प्रणालीव्दारे वितरीत होण्यास खालील कारणांमुळे विलंब होत आहे.

१. नॉन आधार अर्ज नोंदणी केलेल्या अर्जामध्ये आधारक्रमांक अदयावत नसणे.

२. विदयार्थ्यांचे आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न नसणे.

३. विदयार्थ्यांचे आधार क्रमांक इनअॅक्टीव्ह असने.

४. विदयार्थ्यांनी व्हाऊचर रिडीम न करणे.

५. विदयार्थ्यांचे आधार संलग्न असलेले बँकेतील खाते बंद असणे.

६. विदयार्थ्याचे आधार संलग्न मोबाईल क्रमांक बंद असणे.

७. दुस-या हप्त्यासाठी महाविदयालय स्तरावर विदयार्थ्यांची उपस्थिती अदययावत करण्याकरीता अर्ज प्रंलबित असणे.

वरील सर्व बाबी विदयार्थ्यांच्या आधार व बँक खात्याशी निगडीत असून त्या त्यांच्यास्तरावरुन जसे जसे अदययावत केल्या जातील. त्याप्रमाणे विदयार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात आपोआप जमा होणार असल्याचे महाडिबीटी पोर्टलचे तांत्रीक कक्ष व राज्य शासनाचे माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांनी शासनास कळविले आहे.

तथापि, उपरोक्त कारणांमुळे शिष्यवृत्ती/फ्रिशीप रक्कमेचे वितरणामध्ये विलंब होत असल्याची बाब आपल्या स्तरावरुन सर्व स्थानीक विदयार्थी-पालक संघटना, यांच्या मार्फत विदयार्थ्यांना कळविणे व त्यांना आश्वासीत करणे आवश्यक आहे. जेणे करुन सर्व स्तरावरील निर्माण झालेल्या संभ्रमाचे निराकरण होईल. याबाबत प्रसिदधी आपल्या स्तरावरुन देण्यात यावी. शिष्यवृत्तीची/फ्रिशीपच्या अदायगी अभावी अनुसचित जाती,विजाभज, इमाव, व विमाप्र प्रवर्गातील विदयार्थ्यांचे निकालपत्र अथवा इतर कागदपत्रे देतांना महाविदयालयांनी अडवणूक करु नये अन्यथा संदर्भिय क्र.१ च्या शासन निर्णयानुसार संबंधीत महाविदयालयांवर कार्यवाही करण्यात येईल याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त आहेत.

(योगेश पाटील)
सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण जळगाव

प्रत- माहितीस्तव सविनय सादर
१. मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय म.रा.पुणे
२. मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण म.रा.पुणे
३. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नाशिक

(योगेश पाटील)
सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण जळगाव

Scanned with CamScanner